**दिनांक ६/३/१९८७**

# प्रवाह

गुहेत राहणाऱ्या आदिमानवाने आपल्या जोडीदारासाठी स्वतःच्या अन्नातला घास बाजूला काढून ठेवला, त्या क्षणाला मानवी संस्कृतीला सुरूवात झाली. चाक, अग्नी, लेखनकला या सारख्या नवीन नवीन शोधांमुळे मानवाचं जीवनमान सुधारत गेलं आणि त्याचबरोबर मानवी संस्कृती देखील बहरत गेली.

खरं म्हणजे, 'संस्कृती' हा शब्दाशी आपण आपल्या नकळत काही आदर्शवादी मुल्ले जोडून ठेवलेली आहेत. त्यामुळे संस्कृती म्हणजे भव्य आणि उच्च असं काहीतरी ही वीण आपल्या मनात घट्ट बसते. वस्तूतः संस्कृती म्हणजे 'संस्कारीत कृती'! ती चांगली किंवा वाईट देखील असू शकते. समाजमनाच्या विशिष्ट प्रकारच्या घडणीमुळे संस्कृती बनते. उदाहरणांनी हा मुद्दा अधिक स्पष्ट होईल.

'फ्लॅट संस्कृती' असं आपण म्हणतो, तेव्हा फ्लॅटमध्ये राहणाऱ्या माणसांची विशिष्ट प्रकारची मनोरचना आपल्याला अभिप्रेत असते. इथे आपल्याला कोणत्याही आदर्शवादी कल्पना फ्लॅट संस्कृतीशी जोडायच्या नसतात. फ्लॅटमधल्या कुटुंबातील माणसांची वेगवेगळ्या प्रकारची मानसिक घडण एवढाच अर्थ त्यामध्ये आपल्याला अपेक्षित असतो. पहिल्या महायुद्धानंतर जर्मनीत अस्तित्वात असलेल्या 'नाझी' संस्कृतीबद्दल बोलताना नाझींच्या वैशिष्ट्यपूर्ण धोरणांचा आपल्याला उल्लेख करायचं असतो. म्हणजेच, 'संस्कृती' म्हटल्यावर काही तरी भव्यदिव्य असं समजण्याचं काही कारण नाही.

भारतीय संस्कृतीमध्ये पाहताना याच दृष्टीकोनातून पहायला हवं. 'भारतीय संस्कृती' असं म्हटल्यावर आपण निष्कारण हळवे आणि भावनाप्रधान होतो. उलट अलिप्तपणे भारतीय संस्कृतीचे गुणदोष तपासले गेले पाहिजेत. त्यातल्या गुणांबद्दल गौरवाने बोलणं जितकं योग्य तितकच तिच्यातल्या दोषांवर बोट ठेवणं आवश्यक आहे. थोडक्यात, भारतीय संस्कृतीबद्दलचं आपलं चिंतन हे थोडंफार आत्मपरीक्षणात्मक अशा स्वरूपाचं असलं पाहिजे.

सामान्यतः भारतीय संस्कृतीचे स्वरूपाबद्दल टोकाची मतं असणारे दोन विचारप्रवाह दिसतात. त्यातल्या एका प्रवाहानुसार भारतीय संस्कृती ही व्यापक, सहिष्णू आणि सर्वसमावेशक आहे आणि त्यामुळे तिच्यामध्ये विविध तऱ्हेच्या तत्त्वज्ञानाचे रंग मिसळून वैविध्य आलेलं आहे. उलट दुसऱ्या प्रवाहाच्या मते, भारतीय संस्कृती हे अनेक प्रकारच्या, क्वचित परस्परविरोधीही तत्त्वज्ञानाचं कडबोळं आहे आणि त्यामुळे तिचं स्वरूप अतिशय ढोबळ, अस्ताव्यस्त पसरट झालेले आहे. भारतीय संस्कृतीचा अभ्यास करताना आपल्याला या दोन्ही

विचारप्रवाहांचा सुवर्णमध्य साधावा लागेल.  प्रथम आपल्याला एकूणच संस्कृतीच्या श्रेष्ठतेचे निकष ठरवावे लागतील.

केवळ पुरातन असणं हा संस्कृतीच्या श्रेष्ठत्वाचा निकष असू शकत नाही, हे उघड आहे. एखाद्या विशिष्ट संस्कृतीत ज्ञानाची पातळी कितपत उच्च आहे, हा कदाचित श्रेष्ठतेचा निकष ठरू शकेल, पण त्यालाही काही काही मर्यादा आहेत.

संस्कृतीमधील ज्ञानाच्या पातळीचे फायदे समाजातील सर्वात खालच्या थरापर्यंत किती प्रमाणात पोहोचले आहेत, हा श्रेष्ठतेचा निकष असू शकेल, असं मला वाटतं.  याला अर्थातच भौतिक आणि मानसिक परिमाणं आहेत. म्हणजे खालच्यातल्या खालच्या वर्गाची भौतिक समृद्धी आणि त्यांच्या मनातील कमीत कमी न्यूनगंडाची भावना हा श्रेष्ठत्वाचा निकष असायला हवा आणि भारतीय संस्कृती या निकषावर किती प्रमाणात उतरते, त्यावर तिचे मूल्यमापन केलं गेलं पाहिजे.

भारतीय संस्कृतीने भारतीय नागरिकाला नेमकं काय दिलं, या प्रश्नाचे उत्तर 'आध्यात्मिक मानसिकता आहे, असं मला वाटतं. या अध्यात्मिक मानसिकतेने भारतीयांचा जीवनाकडे बघण्याचा दृष्टीकोनच बदलून टाकला आहे. भारतामध्ये अत्तापर्यंत कुठलीही सामाजिक परिवर्तनाची चळवळ या अध्यात्मिक मानसिकतेला साद घातल्याशिवाय अंशतः देखील यशस्वी झालेला नाही, हे ऐतिहासिक सत्य आहे. उदाहरण म्हणून बुद्ध, ज्ञानेश्वर आणि गांधीजी यांच्या नेतृत्वाखालील चळवळी घेता येतील. बुद्धाला अहिंसेचं महत्त्व प्रतिपादन करण्यासाठी अध्यात्मिक तत्त्वज्ञानाचा आधार घ्यावा लागला आणि ज्ञानेश्वरांना सुद्धा चंद्रभागेच्या वाळवंटातील सामाजिक समतेचा महान प्रयोग धर्मातील अध्यात्मिक तत्त्वज्ञानाच्या चौकटीतच यशस्वी करता आला. गांधीजींनी सामान्य माणसाच्या 'आतल्या आवाजाला' हाक दिली, तेंव्हाच सामान्यांमधलं असामान्यत्व जागृत झालं.

थोडक्यात असं म्हणता येईल की, भारतीय संस्कृतीचा प्रवाह हा नदीच्या प्रवाहासारखा आहे. नदी वाहते तरी रहाते. तशीच ही भारतीय संस्कृती प्रवाही आहे आणि तरीही मूलभूत वैशिष्ट्ये टिकवून आहे. या संस्कृती प्रवाहाची बैठक स्थिर असली, तरी तिचं प्रवाहीपण हेच खरं बलस्थान आहे.  त्यामुळेच प्रत्येक नवा संदर्भ हे या प्रवाहाचं नवं वळण ठरतं पण तरीही त्यांच्यातला जिवंतपणा कायम राहतो.